महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था , पुणे
२८, राणीचा बाग, जुने सर्किट हाउस जवळ , पुणे ४११००१
दूरध्वनी: ०२० -२६३६०९४१, २६३६२७७२, २६३३०२३०

## महत्वाची सूचना

**महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी संघ लोकसेवा आयोग नागरी सेवा संपूर्ण तयारी करिता दिल्ली येथील नामवंत खाजगी संस्थेमधून प्रशिक्षण देणे योजना**

सन २०२२-२३ या वर्षा मध्ये श्रीराम'स आय.ए.एस. नवी दिल्ली या संस्थेमार्फत दिल्या जाणाऱ्या संघ लोकसेवा आयोगाच्या (UPSC) नागरी सेवा परीक्षेच्या संपूर्ण तयारी करिता (पूर्व व मुख्य परीक्षा, मुलाखत) प्रशिक्षणासाठी प्रशिक्षणार्थी निवड करण्यासाठी सामायिक प्रवेश परीक्षा (CET) दिनांक: १६.१०.२०२२ (रविवार) रोजी घेण्यात आली.

उपरोक्त परीक्षेतील गुणवत्ता व प्रतीक्षा यादीतील सर्व उमेदवारांनी कृपया आपले वैधता प्रमाणपत्र ज्या अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कडून निर्गमित केलेले असेल त्या समिती कडून जात वैधता प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतीवर "सदरचे जात वैधता प्रमाणपत्र या कार्यालयाकडून निर्गमित केले आहे." असा हस्तलिखित शेरा, सही व शिक्का सह प्राप्त करावेत.

त्यानंतर आपणास सोयीस्कर असलेल्या कोणत्याही अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयामध्ये दिनांक २ ते ४ नोव्हेंबर, २०२२ पर्यंत सदर जात वैधता प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती सोबत खाली नमूद कागदपत्रे मूळ शैक्षणिक कागदपत्राच्या आधारे तपासणी करून त्याच्या छायांकित प्रती सबंधित कार्यालयात जमा कराव्यात. सदर कागदपत्रांची तपासणी अंती काही दोष आढळल्यास आपणास मिळालेला लाभ पुढील गुणवत्ता धारक उमेदवारांस देण्यात येईल.

सदर योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे पुढीलप्रमाणे: -

१. सबंधित प्रवेश परीक्षेसाठी भरलेल्या मूळ अर्जाची प्रत, त्यावर रंगीत सध्याचा फोटो असावा. सोबत २ अतिरिक्त फोटो (मूळ प्रत जमा करावी )
२. अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र छायांकित प्रत
३. अनुसूचित जमातीचे वैधता प्रमाणपत्र छायांकित प्रत
४. दहावी गुण पत्र किंवा प्रमाणपत्र छायांकित प्रत
५. बारावी गुण पत्र किंवा प्रमाणपत्र छायांकित प्रत
६. पदवी गुण पत्र किंवा प्रमाणपत्र छायांकित प्रत
७. पदव्युत्तर पदवी गुण पत्र किंवा प्रमाणपत्र छायांकित प्रत
८. डोमिसाईल प्रमाणपत्र छायांकित प्रत
९. पॅन कार्ड छायांकित प्रत
१०. आधारकार्ड छायांकित प्रत
११. आधारकार्ड लिंक असलेले बँक तपशील – पास बुक छायांकित प्रत
१२. तहसीलदार कार्यालयातून निर्गमित केलेला मूळ उत्पन्नाचा दाखला प्रत (मूळ प्रत जमा करावी )
१३. सिविल सर्जन यांनी निर्गमित केलेला अपंगाचा दाखला छायांकित प्रत (लागू असल्यास)
१४. उपायुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय यांनी निर्गमित केलेला अनाथाचा दाखला छायांकित प्रत (लागू असल्यास )
१५. उमेदवाराचे हमी पत्र

( डॉ. राजेंद्र भारुड भा. प्र. से.)
आयुक्त